<u>प्रपत्र क्र.३२</u>

भाग "अ" (फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद (४४) )

| | | | |
|---|---|---|---|
| MHRT130004892025 | दाखल तारीख | – | १८.०३.२०१५ |
| | नोंदणीकृत तारीख | – | १८.०३.२०१५ |
| | निकाल तारीख | – | ०७.०५.२०२६ |
| | कालावधी | – | वर्षे ११ महिने ०१ दिवस १९ |

## चिपळूण येथील विशेष न्यायालयात

(डॉ. अनिता एस. नेवसे, न्यायाधीश, विशेष न्यायालय, चिपळूण यांचेसमोर)

(जाहीर दिनांक ०७.०५.२०२६)

| | |
|---|---|
| | विशेष खटला क्र.०२/२०२०<br>(जुना विशेष खटला क्र.१२/२०१५)<br>निशाणी क्रमांक २५१<br>गुहागर पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.३६/२०१४ |
| फिर्यादी | महाराष्ट्र शासनाकरीता<br>पोलीस निरीक्षक<br>गुहागर पोलीस ठाणे मार्फत<br>तपासी अधिकारी–अशोक दौलतराव बनकर<br>उपविभागीय पोलीस अधिकारी<br>उपविभागीय पोलीस कार्यालय चिपळूण |
| प्रतिनिधीत्व | अति.सरकारी अभियोक्ता श्री.पी.आर साळवी |
| आरोपी क्र.१ | शांताराम तुकाराम भोजने<br>वय ४९ वर्षे, धंदा – शेती |
| आरोपी क्र.२ | विष्णू पांडुरंग भोजने |

| | |
|---|---|
| | वय ३० वर्षे, धंदा – नोकरी |
| आरोपी क्र.३ | शशिकांत सखाराम भोजने<br>वय ४७ वर्षे, धंदा – नोकरी |
| आरोपी क्र.४ | प्रकाश पांडुरंग भोजने<br>वय २८ वर्षे, धंदा – मेस्त्री काम |
| आरोपी क्र.५ | तुषार शांताराम भोजने<br>वय २४ वर्षे, धंदा – चालक |
| आरोपी क्र.६ | श्रीकांत शशिकांत भोजने<br>वय २२ वर्षे, धंदा – नोकरी |
| आरोपी क्र.७ | संतोष शशिकांत भोजने<br>वय १९ वर्षे, धंदा – शेती |
| आरोपी क्र.८ | संतोष गोपाळ करंजकर - **मयत**<br>वय ४३ वर्षे, धंदा – शेती |
| आरोपी क्र.९ | ९. नितेश चंद्रकांत दाभोळकर<br>वय २० वर्षे, धंदा – शिक्षण |
| आरोपी क्र.१० | विजय गणपत भोजने<br>वय ४९ वर्षे, धंदा – नोकरी |
| आरोपी क्र.११ | विठ्ठल रामचंद्र भोजने<br>वय ६५ वर्षे, धंदा – नोकरी |
| आरोपी क्र.१२ | सौ. प्रतिमा शांताराम भोजने<br>वय ४५ वर्षे, धंदा – गृहिणी |
| आरोपी क्र.१३ | वैष्णवी विष्णू भोजने<br>वय २३ वर्षे, धंदा – गृहिणी |
| आरोपी क्र.१४ | सौ. प्राप्ती प्रकाश भोजने<br>वय २५ वर्षे, धंदा – गृहिणी |

| | |
|---|---|
| आरोपी क्र.१५ | सौ. संचिता संतोष करंजकर<br>वय ४० वर्षे, धंदा – गृहिणी |
| आरोपी क्र.१६ | सौ. सुप्रिया शांताराम भोजने<br>वय २० वर्षे, धंदा – शिक्षण |
| आरोपी क्र.१७ | सौ. सुलोचना पांडुरंग भोजने<br>वय ६० वर्षे, धंदा – गृहिणी |
| आरोपी क्र.१८ | सौ. सविता शशिकांत भोजने<br>वय ५० वर्षे, धंदा – गृहिणी<br>सर्व राहणार मासू, वडाची वाडी,<br>तालुका गुहागर, जिल्हा रत्नागिरी. |
| प्रतिनिधीत्व | वकील श्री.नितीन शरद केळकर आरोपीकरीता |

**भाग "ब"**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १३.०५.२०१४ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | १४.०५.२०१४ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | १८.०३.२०१५ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | ३०.०६.२०१५ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | १९.१०.२०१५ |
| निकालाची आरक्षित तारीख | ०७.०५.२०२६ |
| निकालाची तारीख | ०७.०५.२०२६ |
| जर शिक्षा दिली असेल तर त्या आदेशाची तारीख | .......... |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ नुसार संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शांताराम तुकाराम भोजने | १४.०५.२०१४ | १४.०५.२०१४ | भा.दं.वि.क. ३९५, ४५१, १४३, १४७, १४९, ३५४(अ)(ब), ५०९, ३२३, ५०४, ५०६ अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ चे कलम ३(१)(१०),(११) ना. ह. सं.अधि.१९५५ चे कलम ७(१)(ड) | निर्दोष मुक्त केले. | ..... | निर्दोष मुक्त केल्याने लागू होत नाही. |
| २. | विष्णू पांडुरंग भोजने | --''-- | --''-- | --''-- | --''-- | ..... | --''-- |
| ३. | शशिकांत सखाराम भोजने | --''-- | --''-- | --''-- | --''-- | ..... | --''-- |
| ४. | प्रकाश पांडुरंग भोजने | --''-- | --''-- | --''-- | --''-- | ..... | --''-- |
| ५. | तुषार शांताराम | --''-- | --''-- | --''-- | --''-- | ..... | --''-- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | भोजने | | | | | | |
| ६. | श्रीकांत शशिकांत भोजने | --''-- | --''-- | --''-- | --''-- | ..... | --''-- |
| ७. | संतोष शशिकांत भोजने | --''-- | --''-- | --''-- | --''-- | ..... | --''-- |
| ८. | संतोष गोपाळ करंजकर | --''-- | --''-- | मयत असल्याने लागू नाही. | --''-- | ..... | मयत असल्याने लागू नाही. |
| ९. | नितेश चंद्रकांत दाभोळकर | --''-- | --''-- | --''-- | --''-- | ..... | --''-- |
| १०. | विजय गणपत भोजने | --''-- | --''-- | --''-- | --''-- | ..... | --''-- |
| ११. | विठ्ठल रामचंद्र भोजने | --''-- | --''-- | --''-- | --''-- | ..... | --''-- |
| १२. | प्रतिमा शांताराम भोजने | --''-- | --''-- | --''-- | --''-- | ..... | --''-- |
| १३. | वैष्णवी विष्णू भोजने | --''-- | --''-- | --''-- | --''-- | ..... | --''-- |
| १४. | सौ. प्राप्ती प्रकाश भोजने | --''-- | --''-- | --''-- | --''-- | ..... | --''-- |
| १५. | संचिता संतोष करंजकर | --''-- | --''-- | --''-- | --''-- | ..... | --''-- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १६. | सुप्रिया शांताराम भोजने | --''-- | --''-- | --''-- | --''-- | ..... | --''-- |
| १७. | सुलोचना पांडुरंग भोजने | --''-- | --''-- | --''-- | --''-- | ..... | --''-- |
| १८. | सविता शशिकांत भोजने | --''-- | --''-- | --''-- | -''- | ..... | --''-- |

**भाग "क"** (फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(ii))

**सरकारी / बचाव / न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

अ. सरकारी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इत्यादी साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | आनंद गोविंद भोजने | पंच | ७० |
| २. | प्राची काशिनाथ भोजने | फिर्यादी | ७५ |
| ३. | नमिता नरेश भोजने | स्वतंत्र साक्षीदार | ८६ |
| ४. | समीर कृष्णा चाचे | स्वतंत्र साक्षीदार | १३१ |
| ५. | डॉ. दिपाली प्रमोद काळे उपविभागीय पोलीस अधिकारी | तपासी अधिकारी | १५८ |
| ६. | सचिन बबन चव्हाण | स्वतंत्र साक्षीदार | १८३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | नरेश सिताराम भोजने | स्वतंत्र साक्षीदार | १९९ |
| ८. | डॉ. सत्यार्थप्रकाश काशीनाथ बळवंत | वैद्यकीय अधिकारी | २०३ |
| ९. | अविनाश आनंदराव पाटील | तपासी अधिकारी | २१९ |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इत्यादी साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

क. न्यायालयीन साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इत्यादी साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

## सरकारी / बचाव / न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

अ. सरकारी

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | ७१ | घटनास्थळ पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| २ | ७६ | फिर्यादी जबाब |
| ३ | ७७ | फिर्यादी पुरवणी जबाब |
| ४ | १५९ | पोलीस अधिक्षक रत्नागिरी यांचेकडील आदेश |
| ५ | १६० | घटनास्थळाचा नकाशा काढून मिळणेबाबत केलेला पत्रव्यवहार |
| ६ | १६१ | आरोपी शांताराम तुकाराम भोजने  याचा जातीचा दाखला |
| ७ | १६२ | आरोपी विष्णु पांडुरंग भोजने याचा जातीचा दाखला |
| ८ | १६३ | आरोपी शशिकांत सखाराम भोजने याचा जातीचा दाखला |
| ९ | १६४ | आरोपी प्रकाश पांडुरंग भोजने याचा जातीचा दाखला |
| १० | १६५ | आरोपी तुषार शांताराम भोजने याचा जातीचा दाखला |
| ११ | १६६ | आरोपी श्रीकांत शशिकांत भोजने  याचा जातीचा दाखला |
| १२ | १६७ | आरोपी संतोष शशिकांत भोजने याचा जातीचा दाखला |
| १३ | १६८ | आरोपी संतोष गोपाळ करंजकर याचा जातीचा दाखला |
| १४ | १६९ | आरोपी नितेश चंद्रकांत दाभोळकर याचा जातीचा |

| | | |
|---|---|---|
| | | दाखला |
| १५ | १७० | आरोपी विजय गणपत भोजने याचा जातीचा दाखला |
| १६ | १७१ | आरोपी विठ्ठल रामचंद्र भोजने याचा जातीचा दाखला |
| १७ | १७२ | आरोपी प्रतिभा शांताराम भोजने हिचा जातीचा दाखला |
| १८ | १७३ | आरोपी वैष्णवी विष्णू भोजने हिचा जातीचा दाखला |
| १९ | १७४ | आरोपी प्राप्ती प्रकाश भोजने हिचा जातीचा दाखला |
| २० | १७५ | आरोपी संचिता संतोष करंजकर हिचा जातीचा दाखला |
| २१ | १७६ | आरोपी सुप्रिया शांताराम भोजने हिचा जातीचा दाखला |
| २२ | १७७ | आरोपी सुलोचना पांडूरंग भोजने हिचा जातीचा दाखला |
| २३ | १७८ | आरोपी सविता शशिकांत भोजने हिचा जातीचा दाखला |
| २४ | १७९ | पंचनामा आरोपी नॉमिनल अटकेचा |
| २५ | २०४ | प्राची काशिनाथ भोजने हिचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| २६ | २०५ | काशिनाथ तुकाराम भोजने याचे वैद्यकीय प्रमाणपत्र |

| | | |
|---|---|---|
| २७ | २२० | जातीचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत केलेला पत्रव्यवहार |
| २८ | २२१ | वाढीव कलम लावणेबाबत केलेला पत्रव्यवहार |
| २९ | २२२ | वाढीव कलम लावणेबाबत केलेला पत्रव्यवहार |
| ३० | २२३ | पोलीस अधिक्षक रत्नागिरी यांचा आदेश |
| ३१ | २२४ | साक्षीदार नरेश सिताराम भोजने याचे जबाबातील अधोरेखांकित भाग अ |
| ३२ | २२५ | साक्षीदार समीर कृष्णा चाचे याचे जबाबातील अधोरेखांकित भाग अ |
| ३३ | २५० | आरोपी अनिता लाखण हिचा जातीचा दाखला |

ब. बचाव

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक. | | |

क. न्यायालयीन

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक. | | |

**मुद्देमाल**

| अनु.क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १ | पिवळसर रंगाची साडी |
| २ | २ | जांभळया रंगाचे ब्लाऊज |

## – न्या य नि र्ण य –

( दि. ०७.०५.२०२६ रोजी निकाल न्यायालयासमोर घोषित )

१. आरोपींनी फिर्यादीच्या पतीने डीपीवरील वीज जोडणी बंद करून वीज घालवली असा गैरसमज करून फिर्यादीच्या घराचा पुढील दरवाजा तोडून घरात घुसून फिर्यादी व तिच्या पतीला मारहाण केली आणि फिर्यादीच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल अशी अश्लील शिवीगाळ करून तिचा विनयभंग केला व फिर्यादीला जातीवाचक शब्द उच्चारुन अपमानास्पद वागणूक देऊन अवहेलना केली त्यामुळे भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १४७, १४९, ३९५, ३२३, ३५४अ, ३५४ब, ४५१, ५०९, ५०४, ५०६ सह १४९ आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ चे कलम ३(१)(x)(xi) आणि नागरी हक्क संरक्षणकायदा १९५५ चे कलम ७(१)(ड) अन्वयेच्या आरोपांन्वये सदर आरोपीविरूध्द प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

२. सरकारपक्षाची थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे –

फिर्यादीच्या कथनाप्रमाणे ती तिचे पती, मुले यांच्यासह मासू वडाचीवाडी, तालुका गुहागर, जिल्हा रत्नागिरी येथे राहत असून फिर्यादी ही बौध्द समाजाची आहे मात्र तिचे पती गवळी समाजाचे आहेत. त्यांचा आंतरजातीय विवाह झालेला आहे. दिनांक १३/०५/२०१४ रोजी रात्री ९.०० वाजता फिर्यादी हिचे पती तिची बहिण वनिता, मेव्हणे नरेश तसेच त्यांच्या घरात आलेले पाहुणे सचिन चव्हाण, रुपाली चव्हाण असे रात्रीचे जेवणखाण करुन बसले असता, साधारण रात्री ९.३० वाजताचे दरम्यान घराबाहेर मोठमोठयाने आरडाओरडा व शिवीगाळ होत असल्याचा आवाज ऐकू आला. त्यावेळी आरोपी हे फिर्यादीला व तिच्या पतीला डिपी वरील लाईट

खंडीत केल्याचे कारणावरुन शिवीगाळ करीत होते. तसेच शशिकांत भोजने, शांताराम भोजने, प्रकाश भोजने, श्रीकांत भोजने यांनी तिला शिवीगाळ करुन '' या म्हारडीला बाहेर काढा तिला उभ्याने झवा'' अशी जातीवाचक शिवीगाळ करुन तिला असपृश्य असल्याची अवहेलना करुन तिच्या उजव्या हातावर, मानेवर मारहाण केली तसेच सर्व आरोपींनी फिर्यादीला व तिच्या पतीला बाहेर फरफटत अंगणात आणले. फिर्यादीची साडी ओढून तिचा ब्लाऊज फाडला. फिर्यादीच्या कथनाप्रमाणे आरोपींनी तिच्या गळयातील मंगळसूत्र खेचून नेऊन जबरी चोरी केली आणि फिर्यादीला तिच्या मनाला लज्ञा उत्पन्न होईल असे शब्द उच्चारले आणि तिच्या पतीला शिवीगाळ करुन ठार मारण्याची धमकी दिली. फिर्यादी ही बौध्द समाजाची असलयाचे माहित असून देखील फिर्यादीला जाणीवपुर्वक जातीवाचक शब्द उच्चारुन फिर्यादीची अवहेलना करुन सार्वजनिक जागी अपमान करुन त्यांना तुच्छतेची व हिनतेची वागणूक दिली. त्यामुळे फिर्यादी यांनी गुहागर पोलीस ठाण्यात जाऊन आरोपीविरुध्द सदरची फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने चिपळूण पोलीस ठाण्याच्या पोलीसांनी आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १४७, १४९, ३९५, ३२३, ३५४अ, ३५४ब, ४५१, ५०९, ५०४, ५०६ सह १४९ आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ चे कलम ३(१)(x)(xi) आणि नागरी हक्क संरक्षणकायदा १९५५ चे कलम ७(१)(ड) च्या तरतुदीखाली असल्यामुळे सदर गुन्हयाचे पोलीस उपविभागीय अधिकारी यांनी केले. तपासकामी तपासिक अधिकारी यांनी घटनास्थळाला भेट देऊन घटनास्थळाचा पंचनामा केला, फिर्यादीचा जातीचा दाखला मिळवला, सर्व आरोपींची जात प्रमाणपत्रे प्राप्त केली,

घटनास्थळाचा नकाशा काढून मिळणेकरीता पत्रव्यवहार केला. घटनास्थळाचा नकाशा प्राप्त केला. तसेच कागदपत्र प्राप्त करण्याकरीता अनेक आस्थापनांशी पत्रव्यवहार करुन कागदपत्र प्राप्त करून आरोपपत्रात समाविष्ट केली. तसेच याकामी साक्षीदारांची तपास टिपणे नोंदवून तपासकाम पूर्ण केले. तपासाअंती आरोपींनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे आरोपींविरुध्द या न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.

४. या न्यायालयाने आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १४७, १४९, ३९५, ३२३, ३५४अ, ३५४ब, ४५१, ५०९, ५०४, ५०६ सह १४९ आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ चे कलम ३(१)(x)(xi) आणि नागरी हक्क संरक्षणकायदा १९५५ चे कलम ७(१)(ड) अन्वये नि.४६ येथे दोषारोप निश्चित केले. आरोपींचा बचाव केवळ पुर्णतः नकारार्थी होता. आरोपींचक फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविले. आरोपींनी त्यांचे बचावासाठी कोणताही साक्षीदार तपासला नाही.

५. अभियोगपक्षातर्फे श्री.पी.आर.साळवी, सहा. सरकारी वकील यांनी नि.२२७ येथे पुरसिस देवून सरकारपक्षाचा पुरावा बंद केला. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वये विचारलेल्या प्रश्नांना आरोपींनी उत्तरे दिली मात्र त्याने कोणताही जादा तोंडी किंवा कागदोपत्री पुरावा दिला नाही. अभियोगपक्षातर्फे श्री.पी.आर.साळवी सरकारी वकील व आरोपीतर्फे वकील श्री.एन.एस.केळकर यांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला.

६. गुन्हयांचे स्वरुप व अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा यांचे विवेचन करुन खालील मुद्दे विचारात घेण्यात आले. ते मुद्दे व त्यावरील निष्कर्ष सुसंगत कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | निश्चयार्थ प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपींनी दि.१३.०५.२०१४ रोजी सुमारे संध्याकाळी ९.३० वाजता मासू, वडाचीवाडी, तालुका गुहागर, जिल्हा रत्नागिरी येथे फिर्यादी प्राची काशिनाथ भोजने ही बौध्द अनुसुचित जातीची आहे हे माहिती असतानासुध्दा जाणीवपूर्वक 'या म्हारडीला बाहेर काढा तिला उभ्याने झवा' असे जातीवाचक शब्द उच्चारुन फिर्यादीची अवहेलना करुन सार्वजनिक जागी अपमान करुन त्यांना तुच्छतेची व हिनतेची वागणूक दिली आणि त्यायोगे आरोपींनी अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ चे कलम ३(१)(x)(xi) अन्वये गुन्हा केल्याचे सरकारपक्षाने शाबित केले काय ? | नाही. |
| २ | आरोपींनी घटनेच्या वर नमुद कालावधीत, वेळी व ठिकाणी फिर्यादी हिचेविषयी जाणीवपूर्वक अस्पृश्यता बाळगून तिचा अपमान करण्याचे उद्देशाने वागणूक दिली आणि त्यायोगे आरोपींनी अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ चे कलम ७(१)(ड)अन्वये गुन्हा केल्याचे सरकारपक्षाने शाबित केले काय ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३. | आरोपींनी घटनेच्या वर नमुद कालावधीत, वेळी व ठिकाणी फिर्यादीला जातीवाचक शब्द वापरून अपमान करण्याच्या उद्देशाने अनाधिकारे फिर्यादीच्या घरात प्रवेश केला आणि त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ४५१ सह १४९ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने शाबित केले काय ? | नाही. |
| ४. | आरोपींनी घटनेच्या वर नमुद कालावधीत, वेळी व ठिकाणी फिर्यादीच्या गळयातील मंगळसुत्र खेचून चोरून नेले आणि त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३९५ सह १४९ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने शाबित केले काय ? | नाही. |
| ५. | आरोपींनी घटनेच्या वर नमुद कालावधीत, वेळी व ठिकाणी फिर्यादीला मारहाण, जातीवाचाक शिविगाळी व चोरी करण्याच्या हेतूने गैरकायद्याची मंडळी जमवली आणि त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १४३ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| ६. | आरोपींनी घटनेच्या वर नमुद दिनांकास, वेळी व ठिकाणी फिर्यादीला मारहाण, जातीवाचाक शिविगाळी व चोरी करण्याच्या हेतूने गैरकायद्याची मंडळी जमवली | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | आणि दंगल घडवून आणली आणि त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १४७ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय ? | |
| ७. | आरोपींनी घटनेच्या वर नमुद दिनांकास, वेळी व ठिकाणी फिर्यादी व तिच्या पतीला मारहाण करण्याच्या हेतूने गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादी व तिच्या पतीला मारहाण करत बाहेर अंगणात ओढत आणून स्वेच्छापूर्वक दुखापती केल्या आणि त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३२३ सह १४९ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| ८. | आरोपींनी घटनेच्या वर नमुद दिनांकास, वेळी व ठिकाणी फिर्यादीला तिच्या घरातून साडीला धरून अंगणात ओढत आणून तिचा ब्लाऊज फाडला आणि तिला अवांछित शारीरिक संपर्क साधून तिच्या मनाला लज्ज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले आणि त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३५४अ सह १४९ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| ९. | आरोपींनी घटनेच्या वर नमुद दिनांकास, वेळी व ठिकाणी फिर्यादीला वस्त्रहीन करण्याच्या किंवा नग्न | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | होण्यास भाग पाडण्याच्या उद्देशाने तिच्यावर हल्ला करून तिच्या साडीला धरून अंगणात ओढत आणून तिचा ब्लाऊज फाडला आणि त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३५४ब सह १४९ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय ? | |
| १०. | आरोपींनी घटनेच्या वर नमुद दिनांकास, वेळी व ठिकाणी फिर्यादीच्या साडीला धरून तिला अंगणात ओढत आणून तिचा ब्लाऊज फाडून तिच्या विनयशिलतेचा अपमान केला आणि त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ५०९ सह १४९ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| ११. | आरोपींनी घटनेच्या वर नमुद दिनांकास, वेळी व ठिकाणी फिर्यादी व तिच्या पतीला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून सार्वजनीक शांततेचा भंग केला आणि त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ५०४ सह १४९ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| १२. | आरोपींनी घटनेच्या वर नमुद दिनांकास, वेळी व ठिकाणी फिर्यादी व तिच्या पतीला जाणीवपुर्वक | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | अपमानास्पद वागणूक देऊन धाकधपटशा दाखवून धमकी दिली आणि त्यायोगे आरोपीने भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचे सरकारपक्षाने शाबीत केले काय? | |
| १३. | आरोपींनी घटनेच्या वर नमुद दिनांकास, वेळी व ठिकाणी फिर्यादीच्या गळयातील मंगळसुत्र खेचून चोरुन नेऊन तसेच तिची साडी व ब्लाऊज फाडून तिचे नुकसान केले आणि त्यायोगे आरोपीने भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ४२७ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचे सरकारपक्षाने शाबीत केले काय? | नाही. |
| १४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दे क्र. १ ते १४ करीता</u>**

७. अभिलेखावरील सरकारपक्षाचा तोंडी व कागदोपत्री पुरावा तसेच एकंदरीत परिस्थिती विचारात घेता प्रथमदर्शनी असे निदर्शनास येते की, सरकारपक्षाने आरोपीचा गुन्हा शाबीत करणेकरिता त्यांचेतर्फे एकूण नऊ साक्षीदार तपासले. त्यापैकी साक्षीदार क्र.४ समीर कृष्णा चाचे आणि साक्षीदार क्र.७ नरेश सिताराम भोजने यांनी सरकार पक्षास परिपोषक असा कोणताही पुरावा दिलेला नाही आणि परिणामतः त्यांना फितुर घोषित करण्यात आले. सरकारपक्षाच्या उर्वरित साक्षीदारांपैकी साक्षीदार क्र.१ पंच साक्षीदार,

साक्षीदार क्र.२ फिर्यादी, साक्षीदार क्र.३ प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, साक्षीदार क्र.६ स्वतंत्र साक्षीदार यांचा तोंडी पुरावा अभिलेखावर आणला आहे. गुन्हयाचे स्वरूप पाहता सरकार पक्षाने साक्षीदार क्र.५ व ९ तपासिक अधिकारी यांचा तोंडीपुरावा देखील अभिलेखावर आणलेला आहे. सदर पोलीस साक्षीदारांनी या गुन्हयाचे तपासकाम पूर्ण करून आरोपींविरुध्द सबळ पुरावा आल्यामुळे दोषारोपपत्र दाखल केल्याचे दिसून येते. सदर दोन्ही पोलीस साक्षीदार हे औपचारीक स्वरूपाच्या साक्षीदाराच्या कक्षेत मोडतात. सरकार पक्षाने फिर्यादीला मारहाण झाल्यासंदर्भात साक्षीदार क्र.८ वैद्यकीय अधिकारी यांचा साक्षीपुरावा नोंदवून फिर्यादीला झालेल्या जखमा व त्या अनुषंगाने केलेली वैद्यकीय तपासणी आणि वैद्यकीय प्रमाणपत्र शाबित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अभिलेखावरून ही बाब प्रकर्षाने दिसून येते की, यातील प्रत्यक्षदर्शी किंवा स्वतंत्र साक्षीदार यांच्या साक्षीपुराव्यामध्ये आरोपींनी फिर्यादीला कोणत्या शब्दात जातीवाचक शिवीगाळ केली ते विशिष्ठ शब्द सांगितले नाहीत. असे जरी असले तरी फिर्यादीने मात्र आरोपींनी तिला जातीवाचक शिवीगाळ केल्याचे ठराविक शब्द कथन केले असले तरी घटनेची प्रथम खबर देताना जातीवाचक शब्द कथन केले नाहीत मात्र दि.१४.०५.२०१४ रोजीच्या पुरवणी जबाबामध्ये जातीवाचक शिवीगाळीचे शब्द कथन केले आहेत. मात्र फिर्यादीने प्रथमतः पोलीस ठाण्यात फिर्याद देताना जातीवाचक शिविगाळीचे शब्द का सांगितले नाहीत. यावरून फिर्यादीच्या साक्षीपुराव्यावर साशंकता उपस्थित होते. असे जरी असले तरी न्यायालयाला कायद्याच्या तरतुदी विचारात घेऊन प्रकरण पुढे चालवून आरोपींविरुध्द सबळ पुरावा अभिलेखावर आला आहे काय व सदर पुरावा आरोपींविरुध्दच्या गुन्हयाच्या तोहमतीची सिध्दता करण्याकरीता संयुक्तिक आहे काय हे पाहणे आवश्यक

असते.

८. वरील परिस्थितीत सरकारपक्षाच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येते की, साक्षीदार क्र.१ आनंद गोविंद भोजने पंच साक्षीदार यांचा साक्षीपुरावा नि.७० अन्वये नोंदविलेला आहे. सदर साक्षीदाराने साक्षीपुराव्यात असे सांगितले की, दि.१४.०५.२०१४ रोजी गुहागर पोलीसांनी घटनास्थळ पंचनाम्यासाठी बोलावले होते, त्याचेसमक्ष घटनास्थळाचे परिस्थितीचा पंचनामा नि.७१ प्रमाणे केला. आरोपींतर्फे वकीलांनी सदर पंच साक्षीदाराला उलटतपासात अनेक सुचनात्मक प्रश्न विचारून अनेक महत्वपूर्ण बाबी अभिलेखावर आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदर पंच साक्षीदाराने तो अपहरणाच्या केसमध्ये आरोपी असल्याचे आणि त्या केसमध्ये अटकपूर्व जामीनावर असल्याचे मान्य केले आहे. तसेच त्या केसमध्ये फिर्यादीचा नवरा देखील सह आरोपी असल्याचे मान्य केले. त्यामुळे सदर पंच साक्षीदाराच्या साक्षीपुराव्याची विश्वासार्हता कमी होऊन त्याच्या साक्षीपुराव्यावर विसंबून राहून आरोपींना प्रस्तुत गुन्हयाकरीता दोषी धरता येत नाही.

९. अशा परिस्थितीत सरकार पक्षाची महत्वाची साक्षीदार क्र.२ प्राची काशिनाथ भोजने हिचा साक्षीपुरावा नि.७५ अन्वये नोंदविलेला आहे. फिर्यादीने तिच्या साक्षीपुराव्यात असे सांगितले की, ती तिच्या पती आणि मुलांसह मौजे मासु, वडाचीवाडी, तालुका गुहागर, जिल्हा रत्नागिरी येथे राहत असून ती बौध्द समाजाची आहे. दि.१३.०५.२०१४ रोजी त्यांच्या वाडीतील राधाकृष्ण मंदीरात सत्यनारायणाची पूजा होती व सकाळपासून इतर कार्यक्रम चालू होते. त्यावेळी सकाळी ७.०० वाजता ती घरी हजर होती तिचा

पती कामावर गेला होता. फिर्यादीने पुढे असे कथन केले आहे की, त्या दिवशी वीज गेली होती, त्यानंतर समिर चाचे नावाच्या इसमाने श्री.कदम वायरमन यांना बोलावून घेतले व त्याप्रमाणे श्री. कदम संध्याकाळी ९.३० वाजता डी.पी.जवळ आले आणि त्यावेळी श्री.कदम यांनी फिर्यादीचा पतीला फोन करून बांबूची काठी घेऊन बोलावले व त्याप्रमाणे तिचे पती त्या ठिकाणी गेले होते. फिर्यादीने तोंडी पुराव्यात हे स्पष्ट केले आहे की, तिचे पती संध्याकाळी ९.४५ ते १०.०० वाजताच्या सुमारास घरी परत आले आणि त्यानंतर फिर्यादी, तिचे पती, तिची सासू, बहिण नमिता, तिचा नवरा नरेश आणि तिचे नातेवाईक सचिन आणि त्याची पत्नी रुपाली असे घरी हजर होते.

१०. घटनेबाबत फिर्यादीने साक्षीपुराव्यात पुढे असे कथन केले की, सुमारे १०.०० वाजताच्या सुमारास सर्व १८ आरोपी तिच्या घरी आले, ते शिवीगाळ करीत आले आणि त्यांनी तिच्या घराचा दरवाजा लाथाबुक्यांनी व दगडांनी तोडून टाकला. तसेच तिला घाणेरडया शब्दात शिवीगाळ केली की, "या म्हारडीला उभ्याने झवा, या म्हारडीला बाहेर काढा" आणि जातीवाचक शब्द उच्चारले. तिने साक्षीपुराव्यात असे कथन केले आहे की, आरोपी क्र.१, २ व ६ यांनी तिच्या घरात जाऊन तिची साडी व ब्लाऊज फाडला आणि तिला घराबाहेर अंगणात खेचले तसेच तिच्या गळयातील मंगळसुत्र खेचले. सदर घटनेमध्ये तिच्या गालावर जखम झाली होती. फिर्यादीने पुढे असे कथन केले की, त्यानंतर फिर्यादी व तिचा पती गुहागर पोलीस ठाण्यात गेले आणि दि.१४.०५.२०१४ रोजी घटनेबाबत नि.७६ प्रमाणे फिर्याद दिली. त्यानंतर पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. फिर्यादीने साक्षीपुराव्यात पुढे असे कथन केले की, आरोपींनी तिचे मंगळसुत्र खेचून नेल्याबाबत वेगळी तक्रार दि.१५.०५.२०१४ रोजी नि.७७ प्रमाणे केलेली आहे.

११. आरोपींतर्फे वकीलांनी फिर्यादीला अनेक सुचनात्मक प्रश्न विचारून काही महत्वपूर्ण बाबी अभिलेखावर आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. उलटतपासादरम्यान फिर्यादीने असे कथन केले आहे की, फिर्याद नि.७६ मध्ये आरोपींना तिला "या म्हारडीला उभ्याने झवा, या म्हारडीला बाहेर काढा" असे शब्द नमूद नसल्याचे कथन केले आहे. मात्र ते जातीवाचक शिविगाळीचे शब्द का नमूद नाहीत याचे कारण तिला सांगता येत नसल्याचे तिने मान्य केले आहे. फिर्यादीने उलटतपासात असे कथन केले आहे की, आरोपी विष्णू भोजने याने तिचे मंगळसुत्र खेचल्याबाबत दि.१५.०५.२०१४ रोजी नि.७७ अन्वये तक्रार दिलेली आहे. सदर तक्रारींच्या अनुषंगाने फिर्यादीच्या साक्षीपुराव्याचे बारकाईने पडताळणी करता जातीवाचक शिविगाळीबाबत नि.७७ अन्वये दिलेल्या पुरवणी जबाबात सांगितलेली आहे. तसेच फिर्यादीने तिच्या साक्षीपुराव्यात तथाकथित घटनेच्यावेळी वीज नव्हती आणि वीजेचा प्रकाश देखील नव्हता या बाबी मान्य केल्या आहेत. त्याशिवाय तिचा पती आणि आनंद भोजने यांनी सरपंच पदाकरीता असलेल्या उमेदवाराचे अपहरण केल्याबाबतची तक्रार दाखल आहे ही बाब देखील कथन केली आहे. यावरून फिर्यादीचा पती आणि आनंद भोजने की जो या खटल्यातील साक्षीदार क्र.१ पंच साक्षीदार आहे हे एकमेकांचे ओळखीचे असून त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंद असल्याची बाब प्रकर्षाने दिसून येते. या कारणास्तव देखील फिर्यादी व साक्षीदार क्र.१ यांचा साक्षीपुरावा या केसमधील आरोपींना प्रस्तुत गुन्हयाकरीता दोषी धरण्याकरीता सबळ व पुरेसा नाही.

१२. फिर्यादीच्या तोंडी पुराव्यास बळकटी मिळण्याकरीता सरकार पक्षाने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.३ फिर्यादीची बहिण नमिता नरेश भोजने हिचा साक्षीपुरावा नि.८३ अन्वये नोंदविलेला आहे. सदर साक्षीदाराने

साक्षीपुराव्यात असे कथन केले की, ती बौध्द समाजाची असून फिर्यादी ही तिची बहिण आहे. दि.१३.०५.२०१४ रोजी त्यांच्या वाडीमध्ये सत्यनारायणाची पूजा होती आणि त्या दिवशी रात्री ९.३० वाजताचे सुमारास ती तिच्या पतीसोबत फिर्यादीच्या आजारी मुलाला पाहण्यकरीता गेले होते, त्यावेळी वीज गेली होती आणि फिर्यादीचा पती डी.पी.पाहण्याकरीता गेला होता. त्यानंतर काही वेळाने फिर्यादीचा पती घरी परत आला. सदर साक्षीदाराने साक्षीपुराव्यात पुढे असे कथन केले आहे की, सर्व आरोपी फिर्यादीच्या घराचे अंगणात येऊन शिवीगाळी करू लागले तसेच तिच्या बहिणीला मारहाण केली आणि दरवाजा तोडला. त्यानंतर फिर्यादी, तिचा पती आणि सदर साक्षीदार असे गुहागर पोलीस ठाण्यात गेले आणि फिर्यादीच्या पतीने फिर्याद दिली. पोलीसांनी सदर साक्षीदाराकडे चौकशी करून तिचा जबाब नोंदविला.

१३. आरोपींतर्फे वकीलांनी सदर साक्षीदाराला अनेक सुचनात्मक प्रश्न विचारून काही महत्वपूर्ण बाबी अभिलेखावर आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. उलटतपासात सदर साक्षीदाराने असे कथन केले की, सर्व आरोपींनी तिच्या भाऊजींना ओढत अंगणात आणले, त्यांना मारहाण केली आणि शिवीगाळ केली. सदर साक्षीदाराचा तोंडी पुरावा विचारात घेता या साक्षीदाराने जी बाब फिर्यादीने तिच्या प्रथम नोंदविलेल्या नि.७६ अन्वयेच्या फिर्यादीमध्ये किंवा न्यायालयामोर नोंदविलेल्या साक्षीपुराव्यात कथन केली नाही ती जादाची बाब पुराव्यात सांगितली आहे. याऊलट फिर्यादीने याकामी दोनदा जबाब दिल्याचे स्पष्ट होते. त्यापैकी सुरूवातीलाच फिर्यादीच्या जबाबामध्ये ज्या बाबी सांगण्याच्या राहून गेल्या होत्या त्या बाबी पुरवणी जबाबामध्ये सांगितल्याचे दिसून येते. यावरून फिर्यादीनेच फिर्यादीमधील

उणीवा भरुन काढण्यासाठी पुरवणी जबाब नोंदविल्याची शक्यता नाकारता येत नाही.

१४. सरकार पक्षाने याकामी स्वतंत्र साक्षीदार क्र.४ समीर कृष्णा चाचे याचा पुरावा नि.१३१ अन्वये नोंदविलेला आहे. सदर साक्षीदाराने साक्षीपुराव्यात दि.१३.०५.२०१४ रोजी तो घरात असताना वीज गेली होती आणि वीज महामंडळाचे कर्मचारी गावात आले होते असे कथन केले आहे. मात्र घटनेबाबत काहीही माहिती नसल्याचे सांगून सरकार पक्षास परिपोषक पुरावा दिलेला नाही. परिणामी सरकार पक्षाने सदर साक्षीदारास फितुर जाहीर करून त्यांचा उलटतपास नोंदविला. मात्र उलटतपासात पोलीसांनी त्याचा दि.२४.०५.२०१४ रोजी जबाब घेतला की नाही हे आठवत नसल्याचे विधान केलेले आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष आरोपींना उपरोक्त गुन्हयांकरीता दोषी धरणे न्यायोचित होणारे नाही.

१५. सरकार पक्षाने याकामी साक्षीदार क्र.६ सचिन बाबाजी चव्हाण यांचा साक्षीपुरावा नि.१८३ अन्वये आणलेला आहे. या साक्षीदाराच्या साक्षीपुराव्यावरून तो फिर्यादीच्या पतीचा मित्र आहे आणि घटनेच्या दिवशी तो फिर्यादीच्या घरी गेला होता आणि त्याने घटना पाहिलेली असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या साक्षीपुराव्याचा ऊहापोह होणे संयुक्तीक होणार आहे. साक्षीदार क्र.६ याने साक्षीपुराव्यात असे सांगितले की, दि.१२.०५.२०१४ रोजी फिर्यादीचा पती त्याचा मित्र असल्यामुळे सदर साक्षीदार, त्याची पत्नी आणि मुलासह फिर्यादीच्या घरी गेला होता व दि.१३.०५.२०१४ रोजी रात्री ९.०० वाजता वीज गेल्यामुळे फिर्यादीने तिच्या पतीला फोन करून सांगितले की, घरची लाईट डीम होत असल्यामुळे

डी.पी. बघून या असे सांगितले. त्यामुळे फिर्यादीचा पती काशिनाथ डी.पी. पाहण्यासाठी गेला आणि डी.पी. पाहून परत आला. त्याने साक्षीपुराव्यात पुढे असे सांगितले आहे की, काशिनाथच्या मुलाचे डोके दुखत असल्यामुळे तो औषध घेत होता त्यावेळी आरडाओरड व शिवीगाळ करण्याचा गोंगाट ऐकू आला आणि त्यावेळी काही लोक या "म्हारीला उभ्याने झवा आणि तिला गावातून नागडी फिरवा" असे म्हणाले. त्यानंतर त्या लोकांनी दरवाजा तोडून आत आले आणि म्हणाले की, काशिनाथने वीज बंद करून त्यांच्या कार्यक्रमात व्यत्यय आणला. त्यानंतर त्या लोकांनी प्राचीला आणि काशिनाथला ओढत अंगणात नेले, प्राचीचा ब्लाऊज फाडला, साडी खेचली आणि तिला मारहाण केली इत्यादी बाबी कथन केल्या आहेत.

१६. आरोपींतर्फे वकीलांनी सदर साक्षीदाराचा सखोल उलटतपास नोंदविला. आरोपींच्या वकीलांनी सदर साक्षीदाराच्या उलटतपासामध्ये अनेक सुचनात्मक प्रश्न विचारून काही महत्वपूर्ण बाबी अभिलेखार आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदर साक्षीदाराने उलटतपासात तो मासू गावातील नाही, काशिनाथ शिवाय इतर कोणालाही ओळखत नाही इत्यादी बाबी मान्य केल्या आहेत. सर्वात महत्वाची बाब अशी की, घटना घडतेवेळी तो घरातच होता व तो घराबाहेर आला नाही आणि अंधार असल्यामुळे तो कोणत्याही इसमाला पाहू शकला नाही या बाबी मान्य केल्या आहेत. त्यामुळे या साक्षीदाराने घटनेचा जो घटनाक्रम सांगितलेला आहे तो त्याने प्रत्यक्ष पाहिलेला नाही असेच म्हणावे लागेल आणि घटनेबाबतची त्याची माहिती ही केवळ ऐकीव स्वरूपाची असल्याचे स्पष्ट होते. तसेच याकामीची फिर्यादी व इतर स्वतंत्र व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांच्या साक्षीपुराव्यामध्ये घटनाक्रमाबाबत प्रचंड तफावती असल्याचे आढळून येतात.

त्यामुळे सदर तोंडी पुरावा सरकार पक्षास उपयुक्त ठरू शकत नाही.

१७. अशा परिस्थितीत सरकार पक्षाने साक्षीदार क्र.७ नरेश सिताराम भोजने यांचा साक्षीपुरावा अभिलेखावर नि.१९९ अन्वये आणलेला आहे. सदर साक्षीदाराने दि.१३.०५.२०१४ रोजी काय घडले याबाबत काही आठवत नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे सरकार पक्षाने या साक्षीदारास फितुर घोषित करुन उलटतपास नोंदविला. मात्र उलटतपासामध्ये सरकार पक्षाला मदत होईल असा कोणताही पुरावा आणता आलेला नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराचा साक्षीपुरावा ग्राहय धरता येणार नाही.

१८. फिर्यादीला झालेल्या जखमांच्या अनुषंगाने सरकार पक्षाने साक्षीदार क्र.८ डॉ.सत्यार्थप्रकाश काशिनाथ बळवंत वैद्यकीय अधिकारी यांचा साक्षीपुरावा नि.२०३ अन्वये अभिलेखावर आणलेला आहे. वैद्यकीय अधिकारी यांनी तोंडीपुराव्यात ते दि.११४.०५.२०१४ रोजी गुहागर ग्रामीण रुग्णालयात कर्तव्यावर असताना गुहागर पोलीसांनी जखमी फिर्यादी प्राची काशिनाथ भोजने हिला उपचाराकरीता पाठवले होते व त्याप्रमाणे सदर साक्षीदाराने फिर्यादीवर उपचार केले आणि त्यानुसार तिला झालेल्या जखमांबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र नि.२०४ प्रमाणे दिले असे कथन केले आहे. त्यांनी तोंडी पुराव्यात असे कथन केले की, तसेच त्यांनी जखमी काशिनाथ भोजने याला देखील वैद्यकीय उपचार करून नि.२०५ प्रमाणे वैद्यकीय प्रमाणपत्र दिले आहे. वैद्यकीय अधिकारी यांनी तोंडी पुराव्यात असे कथन केले की, नि.२०४ व २०५ मधील नमूद जखमा या हल्ला केल्याने होऊ शकतात. आरोपीतर्फे वकीलांनी वैद्यकीय अधिकारी यांचा सखोल उलटतपास घेतला व उलटतपासामध्ये त्यांनी अनेक सुचनात्मक प्रश्नांना सकारात्मक उत्तरे दिली

आहेत. वैद्यकीय अधिकारी यांनी जखमींना उपचाराकरीता पोलीस घेऊन आले नव्हते तसेच वैद्यकीय प्रमाणपत्रामधील जखमांचा इतिहास असलेला रकाना रिकामा ठेवलेला आहे या महत्वपूर्ण बाबी मान्य केल्या आहेत. तसेच वैद्यकीय प्रमाणपत्र नि.२०४ व २०५ मधील जखमा या जमिनीवर पडून देखील होऊ शकतात ही बाब स्पष्टपणे मान्य केली आहे. यावरून फिर्यादी व तिच्या पतीला झालेल्या जखमा या केवळ आरोपींनी मारहाण केल्यामुळेच झाल्या हे निश्चित होत नाही.

१९. साहजिकच कोणत्याही फौजदारी खटल्यात तपासी अंमलदार यांचा पुरावा गुन्हा शाबीत करण्याकरिता महत्वपूर्ण व संयुक्तिक असतो म्हणूनच सरकारपक्षाने साक्षीदार क्र.५ तपासी अधिकारी डॉ. दिपाली प्रमोद काळे पोलीस उपअधिक्षक यांचा तोंडी पुरावा नि.१५८ व साक्षीदार क्र.९ अविनाश आनंदराव पाटील तपासिक अधिकारी यांचा साक्षीपुरावा नि.२१९ अन्वये अभिलेखावर आणला आहे. सदर गुन्हयाच्या तपासकामी सदर दोन्ही साक्षीदारांनी त्यांच्या तोंडी पुराव्यात त्यांनी केलेल्या तपासाबाबत सविस्तर साक्ष दिलेली आहे. तोंडी पुराव्यात त्यांनी तपासकामी तपासिक अधिकारी म्हणून कायद्याने ज्या ज्या बाबी अवलंबलेल्या आहेत त्या सर्व बाबी कथन करून अनेक कार्यालयांना केलेला पत्रव्यवहार व त्या अनुषंगाने प्राप्त कागदपत्रांना निशांकित करून घेतलेले आहेत. तसेच तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा आल्यामुळे त्यांनी आरोपपत्र दाखल केल्याचे स्पष्ट केले.

२०. आरोपींतर्फे वकीलांनी तपासिक अधिकारी यांना उलटतपासात अनेक सुचनात्मक प्रश्न विचारून काही महत्वपूर्ण बाबी उलटतपासात आणण्याचा प्रयत्न केला. उलटतपासात तपासिक अधिकारी

साक्षीदार क्र.५ यांनी तथाकथित घटनेच्यावेळी रात्री पूर्ण अंधार होता आणि डी.पी.वरील वीजेचा पुरवठा खंडीत झाला होता इत्यादी बाबी मान्य केल्या आहेत. त्यामुळे एकूणच कोणत्या आरोपीने कोणते कृत्य केले व नेमक्या कोणत्या आरोपीने फिर्यादीला जातीवाचक शिवीगाळ केली या बाबी निश्चितपणे अभिलेखावर आणण्यास सरकार पक्ष अपयशी ठरलेला आहे. तसेच साक्षीदार क्र.५ यांनी बराच कालावधी उलटल्यामुळे घटनास्थळाचे ठिकाण सांगता येणार नाही असे कथन केले आहे. त्याशिवाय साक्षीदार क्र.९ अविनाश पाटील तपासिक अधिकारी यांनीदेखील उलटतपासात घटना रात्रीच्यावेळी अंधारात घडली, सत्यनारायणाच्या पुजेसाठी २०० ते ३०० लोक जमले होते इत्यादी बाबी मान्य केल्या आहेत. दुसरी महत्वाची बाब अशी की, फिर्यादीने आरोपींनी तिला "या म्हारडीला उभ्याने झवा या म्हारडीला बाहेर काढा" अशी शिवीगाळ केल्याचे सांगितले नव्हते ही बाब मान्य केली आहे. तसेच आरोपी क्र.१, २ व ६ हे फिर्यादीच्या घरात आले आणि त्यांनी तिची साडी फाडली असे फिर्याद देताना सांगितले नाही. अशाप्रकारे फिर्यादीने अनेक बाबी फिर्याद देताना सांगितल्या नाहीत मात्र त्या बाबी फिर्यादी साक्षीपुराव्यात कथन केल्या आहेत. त्यामुळे एकूणच फिर्यादी अथवा प्रत्यक्षदर्शी किंवा स्वतंत्र साक्षीदार यांच्या साक्षीपुराव्यात घटनेबाबत केलेली कथने खरी असल्याची सुतराम शक्यता नाही. सदरचे तपासी अंमलदार क्र.५ व ९ हे औपचारीक साक्षीदार आहेत आणि त्यांच्याकडून आरोपींविरुध्दच्या आरोपांची सिध्दता होऊ शकलेली नाही. आरोपीच्या अधिवक्त्यांनी तपासीक अंमलदार यांना उलटतपासात काही सुचनात्मक प्रश्न विचारले असता त्यांनी नकारार्थी उत्तरे दिलेली आहेत. एकंदरीत तपासी अधिकारी यांचा साक्षीपुरावा औपचारीक स्वरूपाचा आहे आणि अशा परिस्थितीत केवळ तपासी अंमलदार

यांच्या साक्षीपुराव्याच्या आधारे आरोपीला प्रस्तुत गुन्हयाकामी दोषी धरणे न्यायोचित होणार नाही.

२१. कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार व नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून फिर्यादीची साक्षच आरोपींविरुध्दच्या गुन्हयाच्या तोहमतीची सिध्दता करण्यासाठी अत्यंत महत्वाची असते. परंतु याकामी फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी आणि स्वतंत्र साक्षीदार यांच्या साक्षीपुराव्यात प्रचंड तफावती असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. तसेच फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील असून याकामीचा साक्षीदार क्र.१ व फिर्यादीचा पती हे दोघे अपहरणाच्या केसमध्ये आरोपी असल्याचे देखील दिसून येते. अशा परिस्थितीत सदर साक्षीदारांची साक्ष विश्वसनीय वाटत नाही. त्यामुळे त्यांच्या साक्षीवर विसंबून राहून आरोपींना याकामी दोषी धरता येणार नाही. सरकार पक्षाच्या महत्वाच्या साक्षीदारांनी उलटतपासात मान्य केलेल्या अनेक महत्वपूर्ण बाबींवरून सदरचा गुन्हा अनुसुचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा कलम ३(१)(x)(xi) च्या परिक्षेपात सरकार पक्षास आणता आलेला नाही ही बाब अभिलेखावरील एकंदरीत परिस्थितीवरून व पुराव्याच्या विवेचनावरून स्पष्ट होते.

२२. अभिलेखावरील एकंदरीत तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट होते की सरकारपक्षाने आरोपींविरुध्दचे गुन्हे शाबीत करणेकरिता जरी नऊ साक्षीदार तपासले असले तरी सरकारपक्षाने आरोपीविरुध्द संयुक्तीक आणि सबळ पुरावा आणल्याचे दिसून येत नाही. अभिलेखावरून ही बाब स्पष्ट होते की, सरकारपक्षाचे महत्वपूर्ण साक्षीदारांनी अभियोगपक्षाच्या विसंगत कथने केल्याने आरोपींविरुध्दच्या गुन्हयाच्या तोहमतीची सिध्दता होऊ शकलेली नाही.

फौजदारी खटल्यामध्ये आरोपीविरुध्द गुन्हा शाबित करण्याकरीता अभियोगपक्षाने संशयाच्या पलिकडे जावून आरोप सिध्द करणे गरजेचे असते. यदाकदाचित अशा प्रक्रियेत संशयाचा एक जरी धागा निर्माण करण्यात आरोपी यशस्वी ठरला असेल तर त्या संशयाचा फायदा आरोपीला मिळतो. परिणामी अभियोगपक्षाने सादर केलेल्या उपरोक्त पुराव्यावरुन आरोपींनी सदरची कृत्ये केली ही बाब शाबित होत नाही. याऊलट सरकार पक्षाच्या साक्षीपुराव्यावरून असे दिसून येते की, फिर्यादीचा पती आणि यातील साक्षीदार क्र.१ यांच्याविरुध्द अपहरणाचा गुन्हा दाखल आहे तसेच यातील फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व स्वतंत्र साक्षीदार हे एकमेकांच्या ओळखीतले आहेत त्यामुळे हितसंबंधी साक्षीदाराच्या कक्षेत मोडतात. अशा परिस्थितीत अभियोगपक्षाने सदर साक्षीदारांकरवी सादर केलेला पुरावा आरोपींना दोषी धरण्यासाठी पुरेसा नाही. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचे आरोप संशयाच्या पलीकडे जावून शाबित केलेले नाहीत. सबब आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. सबब सर्व विवेचनावरुन मी मुद्दा क्र. १ ते १२ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.१३ चे उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ शांताराम तुकाराम भोजने, क्र.२ विष्णू पांडूरंग भोजने, क्र.३ शशिकांत सखाराम भोजने, क्र.४ प्रकाश पांडूरंग भोजने, क्र.५ तुषार शांताराम भोजने, क्र.६ श्रीकांत शशिकांत भोजने, क्र.७ संतोष शशिकांत भोजने, क्र.९ नितेश चंद्रकांत दाभोळकर, क्र.१० विजय गणपत भोजने, क्र.११ विठ्ठल गणपत भोजने, क्र.१२ प्रतिभा शांताराम भोजने, क्र.१३ वैष्णवी विष्णू भोजने, क्र.१४ प्राप्ती प्रकाश भोजने, क्र.१५ संचिता संतोष करंजकर, क्र.१६ सुप्रिया शांताराम भोजने,

क्र.१७ सुलोचना पांडूरंग भोजने, व क्र.१८ सविता शशिकांत भोजने यांची भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १४७, १४९, ३९५, ३२३, ३५४अ, ३५४ब, ४५१, ५०९, ५०४, ५०६ सह १४९ आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ चे कलम ३(१)(x)(xi) आणि नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ चे कलम ७(१)(ड) अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपांमधून फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २३५(१) अनुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जामीन कदबे व बंधपत्रे याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

३. याकामीचा जप्त मुद्देमाल ज.मु.र.नं.१५/२०२२ मधील अ.क्र.१ व २ कडील कपडे मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावेत.

४. सदर न्यायनिर्णयाविरोधात जर वरीष्ठ न्यायालयात अपिल किंवा अन्य याचिका दाखल करण्यात आल्यास, हे न्यायालय आरोपीस सूचित करेल त्यावेळेस आरोपी न्यायालयात हजर होईल या ग्वाहीकरीता आरोपींनी सहा महिन्याच्या कालावधीसाठी प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- (रुपये पंधरा हजार फक्त) या वैयक्तिक जातमुचलका व तितक्याच रक्कमेचा जामीन द्यावयाचे आहेत.

(खुल्या न्यायालयात घोषित.)

ANITA SHRIRANG NEWASE

Digitally signed by ANITA SHRIRANG NEWASE
Date: 2026.05.07 19:17:24 +0530

दिनांक – ०७.०५.२०२६

( डॉ. अनिता एस. नेवसे )

न्यायाधीश, विशेष न्यायालय चिपळूण

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Case Number | | SCST 02/2020<br>(By Judgment) |
| Name of Grade I Stenographer | :- | Mr. Sandeep S. Patil |
| Name of Court | :- | Judge, Special Court &<br>Addl.Sessions Judge, Chiplun<br>(Dr. Anita S. Newase) |
| Date of Dictation on computer | :- | 07.05.2026 |
| Order signed by the P.O. on | :- | 07.05.2026 |
| Order uploaded on | :- | 07.05.2026 |